# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक २९.०८.२०२६ शनिवार**

**१) गणेशोत्सव –२०२६ संबंधाने संयुक्त समन्वय बैठक संपन्न :**

दिनांक २९.०८.२०२६ रोजी १२.०० वा. पोलीस आयुक्तालय, नागपूर शहर, नागपूर महानगर पालीका व जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांचे संयुक्त विद्यमाने मा. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे अध्यक्षतेखाली कविवर्य सुरेश भट सभागृह रेशीमबाग येथे **गणेशोत्सव २०२६** संबंधाने संयुक्त समन्वय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीला नागपूर शहरातील सर्व गणेश मंडळांचे आयोजक पदाधिकारी, तसेच श्री गणेश मुर्ती बनविणारे तसेच विक्री करणारे विक्रेते, शांतता समितीचे सदस्य, मोहल्ला कमिटीचे सदस्य, साऊंड सिस्टीमचे कॉन्ट्रॅक्टर, नागपूर शहरातील सर्व पोलीस अधिकारी तसेच एक खिडकी योजनेतील अधिकारी व अंमलदार तसेच इतर सर्व विभागाचे विभाग प्रमुख हजर होते.

बैठकीदरम्यान उपस्थित गणेश मंडळांचे आयोजक, पदाधिकारी यांनी श्रीगणेश स्थापना व विसर्जन व उत्सवात येणाऱ्या इतर अडी–अडचणी व सुचना उपस्थित मान्यवर अधिकारी यांचे समोर मांडल्या. उपस्थित मान्यवर यांनी त्यांच्या अडचणी समजुन योग्य त्या सुचना दिल्या.

मा. पोलीस आयुक्त श्री विश्वास नांगरे पाटील यांनी गणेश उत्सव हा सामाजिक ऐक्य व सलोखा तसेच नवीन नेतृत्व घडविणारा उत्सव असल्याचे सांगुन प्रत्येक गणेश मंडळाने स्वयंसेवकांची सक्षम व्यवस्था ठेवावी, ध्वनिप्रदुषण संदर्भातील नियमांचे पालन करावे, महिला व बालकांचे सुरक्षेला प्राधान्य दयावे व सर्वांसाठी व्यसनमुक्ती, रक्तदान, शरीर सौष्ठव स्पर्धा तसेच समाज प्रबोधनाचे उपक्रम राबवुन रचनात्मक आणि समाजाला अभिप्रेत असणारा गणेश उत्सव साजरा करावा असे सांगुन यंदाचा गणेश उत्सव हा पर्यावरणपुरक व समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा करण्याचे आवाहन करुन युवकांना सकारात्मक दिशा देणारा गणेश उत्सव ठरेल अशी आशा व्यक्त केली.

मनपा आयुक्त मा. डॉ. श्री विपीन इटनकर यांनी मनपाद्वारे करण्यात आलेल्या विविध उपाय योजनांची माहिती देऊन गणेश उत्सवादरम्यान नागरिकांनी आपली बस, मेट्रो या सारख्या सार्वजनिक परिवहन व्यवस्थेचा उपयोग करावा तसेच मोठया प्रमाणात रक्तदान शिविरे आयोजित करण्याचे आवाहन केले. तसेच त्यांनी प्राप्त सुचनांवर कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधीत अधिकारी यांना दिले. गणेश उत्सव संबंधाने एक खिडकी सुरु करण्यात आली असून सर्वांनी त्याद्वारे योग्य ती परवानगी प्राप्त करावी असे सांगितले.

मा. सहपोलीस आयुक्त यांनी सुचना देताना, प्रत्येक मंडळाने स्वयंसेवकांची यादी तयार ठेवावी, सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करावी, गणेश आगमन व विसर्जन मिरवणुकींचे वाहतुक नियोजन करावे व आपल्यामुळे इतर नागरिकांना त्रास होणार नाही तसेच गणेश मिरवणुकीदरम्यान कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होणार नाही याची विशेष दक्षता घ्यावी असे सांगितले.

समन्यव बैठकीला नागपूर शहराच्या महापौर श्रीमती निता ठाकरे, पोलीस आयुक्त श्री विश्वास नांगरे पाटील, मनपा आयुक्त मा. श्री डॉ. विपीन इटनकर, सहपोलीस आयुक्त श्री नविनचंद्र रेड्डी, अपर पोलीस आयुक्त श्री वसंत परदेशी, श्री राजेंद्र दाभाडे, श्रीमती विनीता शाहु, मपना अति. आयुक्त श्री अंकित, अतिरिक्त जिल्हाधिकारी श्री प्रविण महिरे, सर्व पोलीस उपआयुक्त, नागपुर शहर तसेच मनपा सत्तापक्ष नेता श्री नरेंद्र बोरकर, स्थायी समिती सभापती मा. श्रीमती शिवानी दानी वखरे, पोलीस विभाग, नागपूर महानगरपालिका येथील अधिकारी व कर्मचारी तसेच अग्निशमन विभाग, सेवाभावी संस्था, शांतता समिती सदस्य, मोहल्ला कमिटी सदस्य, गणेश मंडळाचे आयोजक, पदाधिकारी, सदस्य, ध्वनिक्षेपक चालक, मुर्तीकार ई. मोठया संख्येने उपस्थित होते.





**<u>२) भरोसा सेल, गुन्हेशाखा नागपूर शहरतर्फे शासकीय मुलांचे बालगृहात रक्षाबंधन संपन्नः</u>**

दिनांक २८.०८.२०२६ रोजी गुन्हेशाखा, भरोसा सेल यांचे मार्फतीने शासकीय मुलांचे बालगृह, पाटणकर चौक येथे तसेच जिव्हाळा, मुलींचे वसतिगृह, अजनी येथे केअर उपक्रमाअंतर्गत रक्षाबंधनाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. कार्यक्रमामध्ये उपस्थित बालकांना शालेय साहित्य व खाऊचे वाटप करुन मुला—मुलींना मार्गदर्शन करण्यात आले. रक्षाबंधन कार्यक्रमास भरोसा सेल येथील पोलीस निरीक्षक श्रीमती वर्षा मते, सपोनि श्रीमती सुरेखा सागर, पोउपनि अंजली कानबाले, मपोहवा तुलसी शाहु व मपोअं शितल व हेमा बच्चे हे उपस्थित होते.



**<u>(कामगिरी)</u>**

**<u>गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पोलीसांची कामगिरी :— अग्निशस्त्रे बाळगणाऱ्या आरोपीस अटक. ०३ अग्निशस्त्रे जप्त.</u>**

दिनांक २९.०८.२०२६ रोजी गुन्हेशाखा युनिट क्र. ५ चे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, मेकोसाबाग, लुंबीनी नगर, जरिपटका नागपुर येथे राहणारा आरोपी ईसम आकाश राजन थापा वय २९ वर्षे, हा अग्निशस्त्र बाळगुन आहे व लोकांना भिती दाखवित आहे. अशा माहितीवरून नमुद ठिकाणी सापळा रचुन, आरोपीचा शोध घेवुन त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात एक प्राणघातक अग्निशस्त्र मॅगझीनसह व ०२ जिवंत काडतुस मिळुन आले. तसेच त्याचे राहते घराची झडती घेतली असता, त्याचे ताब्यात घरातुन एक देशी बनावटीचे अग्निशस्त्र

स्टील मॅगझीनसह व एक देशी बनावटीचा देशीकट्टा मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन ०३ अग्निशस्त्रे व ०२ जिवंत काडतुस, तसेच वेगवेगळ्या कंपनीचे ०२ मोबाईल फोन असा एकुण किंमती अंदाजे १,५७,०००/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस अग्नीशस्त्राबाबत विचारपुस केली असता, त्याने त्याचा मित्र पाहीजे आरोपी नामे योगेश सिरीया रा. गवळीपुरा सदर याने आकाश भाई रा. खंडवा मध्यप्रदेश याचेकडुन विकत आणल्याचे सांगीतले. आरोपीस अधिक विचारपुस केली असता, त्याने व त्याचा मित्र योगेश सिरीया व अभय यांनी कुणाल समुद्रे व त्याचे साथीदारांना धमकविण्याकरिता दाखविल्याचे सांगीतले. आरोपी याने कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने अग्निशस्त्र बाळगुन मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे जरीपटका येथे आरोपी व पाहिजे आरोपीं क्र. १) योगेश सिरीया रा. गवळीपुरा सदर २) आकाश भाई रा. खंडवा मध्यप्रदेश ३) अभय रा. गिट्टीखदान, डब्ल्युसीएल कॉलनी, नागपूर यांचे विरूध्द कलम ३,२५ भा.ह.का. सुधारणा कायदा कलम ५(१)(अ),२५(१)(अ),२७(१) सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव जरीपटका पोलीसांचे ताब्यात देण्यात आलेले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. विनायक गोल्हे, सपोनि गणेश कदम, पोउपनि. विशाल सांगोळे, पोहवा. राजुसिंग राठोड, चंद्रशेखर गौतम, राजेंद्र टाकळीकर, प्रविण भगत, योगेश महाजन, नजीर शेख, रूपेश नानवटकर, अनिस खान, नापोअं. गणेश ठाकरे, राजु टाकळकर, पोअं. विशाल नागभिडे, दिपक बावनकर, रोशन तांदुळकर व लिलाधर खिरटकर यांनी केली.



**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे नंदनवन :– घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २७.०८.२०२६ चे १६.३० वा. ते २८.०८.२०२६ चे २१.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत, प्लॉट क्र. २४, ज्योती शाळेमागे, रमणा मारोती रोड, गाडगेनगर डी, नागपूर येथे राहणारे फिर्यादी राहुल बंडु अभंगे वय ३८ वर्ष हे आपले राहते घराला कुलुप लावून परिवारासह रक्षाबंधनाकरीता गोळीबार चौक येथे भावाचे घरी मुक्कामी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप तोडुन, घराचे आंत प्रवेश करून, बेडरुममधील लोखंडी आलमारीतील सोन्या–चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती २,२८,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे पोउपनि. प्रकाश साकोरे ९३२५८२७३९९ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(ईतर)**

**१) पोलीस ठाणे सदर हद्यीत बेवारस मिळालेली बॅग संबंधीतास सुपुर्द :**

दिनांक २८.०८.२०२६ रोजी सदर पोलीसांचे पथक रात्रगस्त करीत असता, शितलामाता मंदीर चौक, एसबीआय एटीएमचे बाजुला त्यांना एक काळया रंगाची बॅग बेवारस स्थितीत मिळून आली. बॅगेची पाहणी केली असता, त्यात प्रज्योत दिलीप चिकटे व मोबाईल नंबर दिसल्याने, संपर्क केला असता महिला नामे श्रीमती किरण दिलीप चिकटे रा. वणी, यवतमाळ यांनी नमुद बॅग ही त्यांचा मुलगा प्रज्योत याची असून तो मनोरुग्ण असून त्याचा नागपूर येथे उपचार सुरु आहे व तो ती बॅग काल विसरुन आल्याचे सांगितले. तसेच त्यांनी त्यांचे नातेवाईक युगल प्रमोद ढोरे रा. खापरखेडा, नागपूर यांना पाठविल्याने, पोलीसांनी त्यांचेसमक्ष बॅगेची पाहणी केली असता, त्यामध्ये पासपोर्ट, लायसन्स, एक लॅपटॉप, इतर कागदपत्रे, एक सोन्याची अंगठी व हातघडयाळ असा अंदाजे एकूण २ लाख रुपयांचा मुद्येमाल असल्याचे दिसून आले. प्रमोद ढोरे यांचे ताब्यात बॅग सुपुर्द करण्यात आली. त्यांनी पोलीसांचे मन:पुर्वक आभार व्यक्त केले.

नमुद कार्यवाही वपोनि श्री ज्ञानेश्वर भेदोडकर यांचे मार्गदर्शनात मपोउपनि सुप्रिया कुंडगे, पोउपनि धनाजी पिसे, पोहवा रविशंकर मिश्रा यांनी केली.



**२) आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. तदर्थ जिल्हा न्यायाधिश—२ तथा अति. सत्र न्यायाधीश, नागपुर. | १७७/ २०२६ | कलम ३५३, १४३,१४९, ३४१,३३६, ३३७, ३३२, ४२७ भा.दं.वि. | १) राजु शुक्ला वय ३० वर्ष, रा. पोलीस लाईन टाकळी, नागपूर<br>२) वसंत बोरीकर वय २४ वर्ष रा. कॉटन मार्केट, नागपूर<br>३) नियाज शेख वय ३० वर्ष रा. बाळाभाऊपेठ, नागपूर<br>४) मोहंम्मद इसराईल वय २५ | ०२.०९.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | वर्ष रा. लोधीपुरा, नागपूर<br>५) प्रल्हाद रंगारी वय ५० वर्ष वर्ष रा. चंभारनाला, नागपूर | |
| **२** | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, कोर्ट क्र. ८, नागपुर. | १०६/ २०२६ | कलम १०९(१), ३(५) भा.न्या.सं | १) प्रथमेश उर्फ दद्दु राजेश डाफडे वय २१ वर्ष रा. कर्नलाबाग, आकरे डेकोरेशन जवळ, गणेशपेठ, नागपुर<br>२) रितीक संजय कसोधन वय २० वर्ष रा. गाडीखाना, मॉडेल मिलचे बाजुला, गणेशपेठ नागपूर | २८.०९.२०२६ |

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**